॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246
NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२६–२७/१२५ परिपत्रक दिनांक : २५/०९/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संबंधित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" साजरा करण्याबाबत.

संदर्भ:१) राहुल कर्डिले,जिल्हाधिकारी,नांदेड यांचे जा.क्र.२०२६/सा.शा.१/मा.अ.अ./सिआर दि.०९.०९.२०२६
२)सहा.आयुक्त,समान्य प्रशासन यांचे जा.क्र.२०२६/सा../र.व.का./कावि–ई–१०८९१९७४दि
३) न.म.शिंदे,अव्वर सचिव,म.शा./क्रं.केमाअ२००८/प्र.क्र.३७८/०८/सहा सा.प्र.मं.मुबई इ २० स्पटेंबर २०२८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, दरवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" (International Right to Know Day) म्हणून साजरा करण्यात येतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा शासनाच्या कामकाजातील सहभाग वाढविण्यासाठी माहितीच्या अधिकाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामकाजासंदर्भातील माहिती मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याबाबत विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे आणि माहितीच्या अधिकाराचा प्रभावी व जबाबदारीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" विविध जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात यावा.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व संकुले, विभाग, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये तसेच संबंधित घटकांनी आपल्या स्तरावर पुढीलप्रमाणे उपक्रम आयोजित करावेत.

माहितीच्या अधिकाराबाबत जनजागृतीपर व्याख्यान/मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करणे.

1)विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याबाबत चर्चासत्र आयोजित करणे.

2) माहितीचा अधिकार, पारदर्शकता व उत्तरदायित्व या विषयावर निबंध, वक्तृत्व किंवा प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करणे.

3)माहिती अधिकाराच्या प्रभावी वापराबाबत जनजागृतीपर फलक, पोस्टर व संदेश प्रदर्शित करणे.

4) माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी, नागरिकांचे अधिकार व अर्ज करण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करणे.

आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल व छायाचित्रे सोबत जोडलेल्या परिपत्राकाचे अवलोकन संबंधित कार्यालयास सादर करणे.

सदर उपक्रमामध्ये विद्यापीठातील अधिकारी/ कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच संबंधित घटकांनी सक्रिय सहभाग नोंदवून पारदर्शक, उत्तरदायी व लोकाभिमुख प्रशासनाच्या निर्मितीस हातभार लावावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

डॉ.मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

1/644107/2026


विभागीय आयुक्त कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
(सामान्य प्रशासन विभाग)

ईमेलः- dcg.aurangabad@gmail.com दुरध्वनी क्रमांक: ०२४०-२३३१०८४


---

जा.क्र.२०२६/सा.प्र./र.व.का/कावि-ई-१०८९१९७४ दिनांकः निम्नस्वाक्षरीत

**प्रति,**

**१. मा.जिल्हाधिकारी,**
**छत्रपती संभाजीनगर/जालना/परभणी/हिंगोली/नांदेड/बीड/लातूर/धाराशिव**

**२. मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर/नांदेड**

**३. मा.पोलिस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

**४. मा.आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर/जालना/परभणी/लातूर/नांदेड**

**५. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**छत्रपती संभाजीनगर/जालना/परभणी/हिंगोली/नांदेड/बीड/लातूर/धाराशिव**

**६. सर्व प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर विभाग**

**७. सर्व शाखा प्रमुख, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

**विषयः- २८ सप्टेंबर हा दिवस "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणुन साजरा करणेबाबत...**

**संदर्भ –** शासन निर्णय क्र. केमाअ २००८/प्र.क्र.३७८/०८/सहा, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२ दि.२० सप्टेंबर, २००८.

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय शासन निर्णयान्वये ***"दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात यावा. या दिवशी शालेय शिक्षण विभाग तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीचा अधिकार या विषयावर आधारित प्रश्नमंजूषा, चित्रकला, निबंध व वक्तृत्व इ. सारख्या स्पर्धा तसेच चर्चासत्र व व्याख्यानमाला आयोजित कराव्यात. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने समाज कार्यकर्त्यांकरिता व इच्छुक गटांकरिता भित्तीपत्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चर्चासत्र, व्याख्यानमाला इ उपक्रम आयोजित करावेत या उपक्रमांसाठीच्या पारितोषिकांची व्यवस्था स्थानिक पातळीवर लायन्स क्लब, रोटरी क्लब अशा विविध समाजसेवी संस्थांच्या सहयोगाने करण्यात यावी. अशा प्रकारे दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करुन माहितीच्या अधिकाराबाबत समाजात व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यास दिनांक २८ सप्टेंबर, २००८ पासून सुरवात करावी. जिल्ह्यात हे उपक्रम व्यापक पातळीवर राबविण्याची जबाबदारी सर्व जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे. माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी शासनास दरवर्षी ऑक्टोबर अखेर सादर करावा"*** *असे नमुद आहे.*

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन या वर्षी माहिती अधिकार दिन **सोमवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२६ रोजी "माहिती अधिकार दिन"** म्हणून साजरा करण्यात यावा. संदर्भाधीन दिनांक २० सप्टेंबर, २००८, रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सुचनांचे पालन करुन आपल्या अधिनस्त कार्यालयांना **"माहिती अधिकार दिन"** साजरा करण्याबाबत सुचित करावे व सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास व कार्यालयास

10891974


**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**
**(सामान्य प्रशासन विभाग)**

**ईमेल:-** dcg.aurangabad@gmail.com **दुरध्वनी क्रमांक:** ०२४०-२३३१०८४


---

(छायाचित्रासह) सादर करावा. तसेच शासन निर्णयात नमूद प्रमाणे आपले कार्यालयात तसेच अधिनस्त कार्यालयात शासन निर्णयाची अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी, ही विनंती.

**सोबत:- संदर्भ क्र.१ ची छायाप्रत**

Digitally signed by
MANJUSHA RAMCHANDRA MISKAR
Date: 03-09-2026 16:22:59

**सह आयुक्त, सामान्य प्रशासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**

**प्रत-**

मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, १९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालयासमोर मुंबई-४०००३२ यांना माहितीस्तव

**२८ सप्टेंबर हा दिवस " आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**शासन निर्णय क्रमांक -केमाअ २००८/प्र.क्र.३७८/०८/सहा,**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,**
**दिनांक - २० सप्टेंबर, २००८.**

प्रस्तावना :-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा देशभरात दिनांक १२/१०/२००५ पासून लागू करण्यात आला आहे. शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलांमुळे अल्पावधीतच् राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरुपात लोकाभिमुख झाला आहे. महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या व्यापक प्रसिध्दीकरिता व प्रभावी अंमलबजावणीकरिता शासन स्तरावरुन सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी माहितीचा अधिकार अधिनियम या कायद्यातील तरतुदी आणि कार्यपध्दती, विविध दृकश्राव्य माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देवून व विविध उपक्रम राबवून, त्या जास्तीतजास्त नागरिकांपर्यत पाहोचविण्याचा शासनाचा मानस आहे. यास्तव प्रतिवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस "माहिती अधिकार दिन" म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय प्रसृत करण्यात येत आहे.

निर्णय :-

दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात यावा. या दिवशी शालेय शिक्षण विभाग तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहितीचा अधिकार या विषयावर आधारित प्रश्नमंजूषा, चित्रकला, निबंध व वक्तृत्व इ. सारख्या स्पर्धा तसेच चर्चासत्र व व्याख्यानमाला आयोजित कराव्यात. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व

 कृ.मा.प.

T/.D:Thorat.CR. 378.08.lwp

अशासकीय समाजसेवी संस्थांच्या मदतीने समाज कार्यकर्त्यांकरिता व इच्छुक गटांकरिता भित्तीपत्र स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चर्चासत्र, व्याख्यानमाला इ. उपक्रम आयोजित करावेत. या उपक्रमांसाठीच्या पारितोषिकांची व्यवस्था स्थानिक पातळीवर लायन्स क्लब, रोटरी क्लब अशा विविध समाजसेवी संस्थांच्या सहयोगाने करण्यात यावी. अशा प्रकारे दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करुन माहितीच्या अधिकाराबाबत समाजात व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यास दिनांक २८ सप्टेंबर, २००८ पासून सुरवात करावी. जिल्ह्यात हे उपक्रम व्यापक पातळीवर राबविण्याची जबाबदारी सर्व जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे.

माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी शासनास दरवर्षी ऑक्टोबरअखेर सादर करावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in वर संगणक सांकेतांक क्रमांक २००८०९२०१५५३१८००१ वर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( न. म. शिंदे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री /मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
मुख्य सचिवांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग
मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई

कृ.पु.प.

T/.D:Thorat.CR. 378.08.lwp